# मुलुंड सहकार विश्व को.ऑप.हौ.सो.लि.

(रजि.नं.बी.ओ.एम./एच.एस.जी/२२१९/६९)

**नाहुर व्हिलेज रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०००८०**

## विशेष सर्वसाधारण सभा नोटीस

सन्माननीय सभासद बंधू - भगिनींनो

मुलुंड सहकार विश्व को.ऑप.हौ.सो.लि.च्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा उपविधी क्र.९६, नुसार संस्थेचे पदसिध्द अध्यक्ष श्री.सचिन एस.माने यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि. २७/०७/२०२५ रोजी दुपारी ठीक १.०० वा. महाराष्ट्र सेवा संघ, अपना बाजार, जे.एन.रोड, मुलुंड (प), मुंबई - ४०००८० या ठिकाणी आयोजित करण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### -: सभेपुढील विषय :-

**विषय क्र. १ :-** **मुलुंड सहकार विश्व को.ऑप.सो.लि. संस्थेच्या A,B,C,D,E, गुलमोहर, पारिजात व रजनीगंधा या इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी विकासकाकडून प्राप्त निविदानमधून एका विकासकाची निवड करणे.**

**विशेष सर्वसाधारण सभा रुपरेषा ( Minit to Minit Program)**

1) SACVIR REALTORS LLP - 2.00 P.M
2) VINAYAK DEVELOPER - 3.00 P.M
3) चहापान ब्रेक - 4.00 P.M
4) PMC सादरीकरण - 4.30 P.M
5) विकासकांची मतदानाव्दारे निवड प्रक्रिया करणे - 5.00 P.M

**सोबत - विकासक निविदा संक्षीप्त तक्ता**

**सही**

**श्री.आकाशनंद हिरवे**
**सचिव**

**दिनांक - १०/०७/२०२५**

ठिकाण - मुलुंड, मुंबई

**विशेष सूचना -**

१) गणसंख्या अभावी सभा स्थगित झाल्यास नियमाप्रमाणे त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर सभा घेण्यात येईल अशा सभेचं गणसंख्येचे बंधन असणार नाही.

२) अधिकृत सभासदांशिवाय इतर सभासदाला प्रवेश दिला जाणार नाही.

३) सभेच्या छायाचित्रणाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

४) सभेसबंधी सभासदांच्या काही लेखी सूचना असल्यास दि.१८/०७/२०२५ सायं. ७.०० वा. पर्यंत सोसायटी कार्यालयात स्वीकारल्या जातील व त्यानंतर आलेल्या सूचनांचा विचार केला जाणार नाही.

# मुलुंड सहकार विश्व को.ऑप.हौ.सो.लि.

(रजि.नं.बी.ओ.एम./एच.एस.जी/२२१९/६९)

**नाहुर व्हिलेज रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई - ४०००८०**

## निवेदन

आदरणीय सभासद बंधू भगिनींनो सप्रेम जय भीम जय जिनेन्द्र

ज्या गोष्टीसाठी आपण आमच्यावर पूर्ण विश्वास ठेवून निवडून दिलेत त्या सोसायटीच्या पुनर्विकास प्रकल्पाचा महत्त्वाचा टप्पा आपण पार करत आहोत अनेक अडचणीवर मात करुन गेली तीन वर्ष प्रचंड मेहनत करुन सोसायटीचा कारभार सुरळीत करुन पुनर्विकासाची प्रक्रिया नियमानुसार पार करत आहोत आणि हे सर्व आपल्या सहकार्यामुळेच शक्य होत आहे.

बंधुनो २०१६ पासून आपली सोसायटी पुनर्विकासाच्या कामास लागली आहे परंतु अनेक अडचणींना तोंड दयावे लागले आहे. त्यातच संगीता इन्क्लिव बरोबर केलेले बेकादेशीर करार, सहकार न्यायालयातील प्रलंबित दावे, सभासदांची प्रचंड थकबाकी, प्रॉपर्टी टॅक्स, पाणीपट्टीची असणारी थकीत देय रक्कम आणि शेजारच्या संस्थेने बळकवलेली जागा, संस्थेचा ताळेबंद व जमा खर्चात असलेल्या उणीव हया सर्व गोष्टीवर काम करुन त्या गोष्टी नियमित करण्याचा प्रयत्न कमिटीने प्रचंड मेहनत करुन केलेला आहे.

बंधुनो संस्थेची सद्य परिस्थिती पाहता इमारती ३० ते ५० वर्षे जुन्या झालेल्या आहेत त्यातच ए.बी.सि.डी.ई इमारतीची अवस्था खूप धोकादायक झाली आहे. दररोज काहीतरी पडझड चालू आहे. इमारतींच्या पिलरला भेगा गेल्या आहेत. पावसाळयात इमारतींच्या पायाभरणीतुन पाणी वाहू लागले हे सर्व पाहता कमिटीने अत्यंत मेहनत करुन विकासकाकडून निविदा मागून त्यांच्याकडून संस्थेस हवे त्या गोष्टीची मागणी करुन प्रत्येक विकासकाबरोबर पीएमसीच्या व आपले कायदेशीर

सल्लागार यांच्या मदतीने पाच पाच मिटींग करुन प्रत्येक गोष्टीच्या लिखित ऑफर्स घेतल्या आहेत प्रत्येक टप्प्यात झालेल्या गोष्टींची आपणास वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे. पहिल्या टप्प्यात सहा विकासकांपैकी चौघांची निवड करण्यात आली त्यानंतर चौघांपैकी तिघांची निवड करण्यात आली आणि आता शेवटी अंतिम विकासकांची निवड करण्यासाठी तिघांपैकी दोन विकासकांना निवड आपल्यासमोर घेवून येत आहोत. त्यातुन एका विकासकाची निवड करावयाची आहे..

बंधूनो आपल्या सर्वांच्या मागणीनुसार सर्व सभासदांना मिळणारा एरिया, ऑफर्स, भाडे कोरफॉस फंड, बॅंक गॅरंटी, पीएमसी व कायदेतज्ञांची फी एकास एक पार्किंग आणि मिळणा-या सर्व सुखसोयी या सर्व गोष्टींचा चार चार वेळा ऑफर्स मागवून संस्थेला असणा-या सर्व अडचणी सोडविण्याचा होकारावर कमिटीने दोन विकासकांना छाननी करुन आपल्यासमोर घेवून येत आहोत.

विकासकांनी दिलेल्या ऑफर्सचा पूर्ण तक्ता या नोटीसी सोबत आपणांसमोर ठेवण्यात येत आहे तसेच इतर चार विकासकांची निवड का करण्यात आली नाही याची कारणे देखील आपणास देण्यात येतील वरील सर्व गोष्टींच्या लिखित ऑफर्स यांचे चित्रीकरण करुन घेण्यात आले आहे.

बंधुनो आपल्या संस्थेचा पुनर्विकास हा पुढच्या पिढीच्या भविष्यसाठी मैलाचा दगड ठरणार आहे तरी सर्व सभासदांनी आपल्या भविष्यातील घर संस्थेच्या भवितव्यासाठी सर्व गोष्टींचा विचार करुन या प्रक्रियेत सहभाग घ्यावा, सर्वांना ही शेवटची संधी आहे. आपल्या सुदैवाने आपल्या पुढे ठेवलेले विकासक सर्व दृष्टीने चांगले असून भविष्याचा विचार करुन निवड करावी ही विनंती. आपल्या कमिटीने गेली तीन वर्षे प्रचंड मेहनत घेऊन आपल्या सहकार्यामुळे आपण इथपर्यंत पोहोचलो आहोत. काही छोटया छोटया त्रुटी असतील त्याही दूर करण्यात येतील कुठल्याही सभासदावर अन्याय होणार नाही याची काळजी कमिटी घेत आहे काही सभासदांनी

अहंकार सोडून आपल्या अपूर्ण असलेल्या गोष्टी समंजसपणे सोडवण्यासाठी पुढे यावं सर्व गोष्टी कायदेशीर मार्गाने सोडविण्यास कमिटी तत्पर आहे ज्या सभासदांची थकबाकी आहे त्यांनी ती थकबाकी त्वरित भरण्याची व्यवस्था करावी जे सभासद कालकधीत झाले आहेत त्यांच्या वारसांनी वारस नोंद करुन आपल्या घराचा हक्क निश्चित करण्यात पुढाकार घ्यावा जेणेकरुन भविष्यात मिळणारे फायदे, हक्क, निश्चित करण्यात येतील.

बंधुनो पन्नास वर्षापूर्वी आपल्या आई वडिलांनी रक्ताचे पाणी करुन आपल्या डोक्यावर चांगले छप्पर दिले आता आपली जबाबदारी आपल्या भावी पिढीसाठी चांगला निर्णय घेऊन त्यांच्या भविष्याची निश्चिती करावी असे आव्हान आहे. कमिटी सर्व सहकार्य करण्यासाठी तयार आहे.

बंधूंनो संधी एकदाच येथे चला या संधीचे सोनं करुया सर्वांच्या सहकार्याने, विचाराने आपल्या संस्थेचे आणि भावी पिढीचे भविष्य घडवू या.

आता नाही तर कधीच नाही ! आपला विश्वास हीच आमची ताकद !

**जय भिम ! जय जिनेन्द्र**
**सर्वांना शुभेच्छा**

**सही**



**श्री.आकाशनंद हिरवे**
**सचिव**

**दिनांक - १०/०७/२०२५**
ठिकाण - मुलुंड, मुंबई